MHND170006612025

**<u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, हिमायतनगर, जि. नांदेड</u>**
(पीठासिन अधिकारी श्री. झेड. झेड. कादरी)

**<u>किरकोळ दिवाणी अर्ज (न्यायिक चौकशी नंबर) १२२/२०२५.</u>**
**निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश**

| | | |
|---|---|---|
| ०१. | **लक्ष्मीबाई भ्र. किसनराव वानखेडे.**<br>वय. ५३ वर्षे, धंदा. घरकाम<br>रा. मार्लेगाव, ता. उमरखेड, जि. यवतमाळ | **अर्जदार** |
| ०२. | **गोदावरीबाई भ्र. सुभाष मिरासे.**<br>वय. ५० वर्षे, धंदा. घरकाम<br>रा. सरसम बु., ता. हिमायतनगर, जि. नांदेड | |
| | ***विरुध्द*** | |
| ०१. | **शांताबाई भ्र. पांडुरंग वानखेडे**<br>वय. ५५ वर्षे, धंदा. घरकाम<br>रा. दिघी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड | **गैरअर्जदार** |

**०१.** प्रस्तुत अर्ज अर्जदार क्र.०१ व ०२ आणि गैरअर्जदार यांची आई नामे मयत 'गयाबाई भ्र. रामजी तवर (देवसरकर)' यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता 'मुंबई नियमन कायदा, १९२७' चे कलम ०२ आणि ०३ प्रमाणे अर्ज दाखल करुन अर्जदारांना वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन दाखल केला आहे.

**०२.** अर्जदारांनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, अर्जदार क्र.०१ व ०२ आणि गैरअर्जदार यांची आई नामे मयत 'गयाबाई भ्र. रामजी तवर (देवसरकर)' ह्या दिनांक

०५/०६/२०२५ रोजी मौजे टेंभुर्णी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड येथे मयत झाले. त्यांना अर्जदार क्र.०१ व ०२ आणि गैरअर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. तसेच अर्जदार क्र.०१ व ०२ आणि गैरअर्जदार यांची आई नामे 'गयाबाई भ्र. रामजी तवर (देवसरकर)' मयत झालेले आहेत हे दर्शविण्याकरीता ग्रामपंचायत कार्यालय टेंभुर्णी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड यांचे मृत्यू प्रमाणपत्र निशाणी क्र.०५ दिनांक २२.१२.२०२५ सोबत दाखल केलेले आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांना खाजगी व शासकीय कामाकरीता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

**०३.** गैरअर्जदार यांना सदर प्रकरणाची नोटीस दिनांक १६.०१.२०२६ रोजी निशाणी क्र.०९ वर प्राप्त झाली आणि सदर प्रकरणात ते हजर झाले. अर्जदार व गैरअर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस या नात्याने तिघींनाही वारस प्रमाणपत्र देण्यात यावे अशी पुरशीस निशाणी क्र.१७ वर देण्यात आली. त्यानंतर अर्जदारानी त्यांच्या कथनांच्या पुष्टयर्थ अर्जदार यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रमांक १६ येथे दिले आहे. पुराव्या मध्ये त्यांनी अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली असुन अर्जदार व गैरअर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुत प्रकरणात दिनांक २२/१२/२०२५ रोजीच्या निशाणी क्र.०१ वरील पारित आदेशान्वये दैनिक 'श्रमिक एकजूट' या वर्तमानपत्रात दिनांक २४/१२/२०२५ रोजी निशाणी क्रमांक १२ वरील जाहीर प्रकटन प्रसिध्द करणेत आले होते व त्या अनुषंगाने सदर वारस प्रमाणपत्रा करिता जाहिर आक्षेप मागविण्यात आले. असे असले तरी जाहीर प्रकटनाचे उत्तरात अद्याप न्यायालया समोर कोणतेही/कोणाकडुनही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

**०५.** अर्जदारांनी अर्जाच्या पुष्ट्यर्थ अर्जदारांचे आधार कार्ड, मयत 'गयाबाई भ्र. रामजी तवर (देवसरकर)' यांचे मृत्यु प्रमाणपत्र, दाखल केले आहे. अर्जदाराचे कथन व त्यांनी दिलेला

तोंडी पुरावा व दाखल कागदपत्रीय पुरावा यावरुन असे दिसून येते की, अर्जदार व गैरअर्जदार हेच मयत 'गयाबाई भ्र. रामजी तवर (देवसरकर)' यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र देण्यात कोणतीही अडचण नाही, असे दिसुन येते. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारित करतो.

## आ दे श.

**०१.** अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येतो. अर्जदार क्र.०१ लक्ष्मीबाई भ्र. किसनराव वानखेडे, अर्जदार क्र.०२ गोदावरीबाई भ्र. सुभाष मिरासे व गैरअर्जदार शांताबाई भ्र. पांडुरंग वानखेडे हेच मयत 'गयाबाई भ्र. रामजी तवर (देवसरकर)' यांचे वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

**०२.** वारसाचे प्रमाणपत्रासाठी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क जमा केल्या नंतर वारसा प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SYED ZAMEER AHEMAD SYED ZAHOOR AHEMAD QUADRI
Date: 2026.06.10 16:36:03 +0530

**हिमायतनगर.**
दिनांक : १० जून २०२६.

(झेड. झेड. कादरी)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**हिमायतनगर**.

**CERTIFICATE**

| | |
|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order. | |
| Name of the Stenographer | N.K.Hingmire |
| Court Name | Court of CJJD & JMFC,<br>Tq. Himayatnagar.<br>Dist. Nanded |
| Judgment signed by the Presiding Officer on | 10.06.2026 |
| Judgment/Order uploaded on | 10.06.2026 |